Vol 2 Issue 10 Nov 2012

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *अंधश्रद्धाः विकासातील अडथळा*

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

प्रस्तावना :

अंधश्रद्धांमुळे आपल्या देशाचे सर्वात जास्त नुकसान झाले. आपल्या देशावर प्राचीन काळापासून अनेक परकीयांची आक्रमणे झालीत. त्यात भारतीयांचा पराभव होवून या देशात परकीय राजवटी स्थिरावल्यात. त्यांनी आपल्यावर गुलामगिरी लादली. प्राचीन भारताचा युरोपियन राष्ट्रांशी व्यापार चालत असे. भारतीय मालाला युरोपात मोठ्याप्रमाणावर मागणी होती. व्यापारी प्रमुख केंद्र कॉन्स्टॅन्टिनोपल तुर्कांनी जिंकल्यामुळे जमिनीवरील हा व्यापार बंद पडला. म्हणून भारत आणि युरोप यांना जोडणाऱ्या नव्या जलमार्गाच्या शोधास प्रारंभ झाला. अनेक युरोपियन धाडशी खलाशी भारताच्या शोधाकरिता सागर सफारीवर निघाले. मात्र या मार्गाच्या शोधाची गरज एकाही भारतीयास वाटली नाही. याचे कारण आपल्या समाजात समुद्र पर्यटनानं आपला धर्म नष्ट होतो अशी अंधश्रद्धा होती. म्हणजेच पाश्चात्यांच्या प्रगतीचे मर्म उमगले नाही तरी चालेल, आपण युरोपमध्ये जाता कामा नये आणि समुद्रपर्यटन करून आपला धर्म तर अजिबात बुडवू नये. या अंधश्रद्धेमुळे आपण मागासल्या युगातच अडकून राहिलो. पाश्चात्य भौतिक ज्ञानाचा परिचय झाला नाही. आपले पौर्वात्य तेच सर्वकष प्रागतिक असल्याच्या भ्रमातच आपण वावरत राहिलो. जातिभेद, पंथभेद, वरिष्ठ–कनिष्ठ ह्या मानवनिर्मित अंधश्रद्धाळूपणामुळे आपल्या समाजात ऐक्य निर्माण झालेच नाही. ऐतद्देशीय राज्यकर्त्यांमध्ये तर कमालीचा अंधश्रद्धाळूपणा होता. कर्मकांड, मुहूर्त पहाणे, शकून–अपशकून यावर विश्वास ठेवणे, राजपद हे ईश्वरी वरदान असल्याचे समजून जनहिताकडं दुर्लक्ष करणे, वैज्ञानिकतेला विरोध करून ग्रंथ आणि शब्द प्रामाण्याचा स्वीकार करणे, यामुळे राज्यकर्तयांचे प्रशासन आणि लष्करी ध्येय–धोरणे आणि सज्जता यात आधुनिकतेचा उद्भव होवू शकला नाही. त्याच क्षेत्रात ते हरपले. पर्यायाने इस्लामी आणि पुढे ब्रिटिश आक्रमणाला हा देश बळी पडला. या दोन्ही राजवटींच्या प्रदीर्घ काळात आपल्या समाजाचं प्रचंड प्रमाणात आर्थिक शोषण तर झालेच, परंतु सामाजिक, धार्मिक आणि सांकृतिक अन्याय–अत्याचाराच्या भयंकर यातना सोसाव्या लागल्यात. हा देश आणि समाज केव्हांच पारतंत्र्यात भिरकावला गेला याचे भानच स्वकीयांना राहिले नाही.

### *संताच्या चमात्कारातील विज्ञान :*

आपल्या देशातील इतिहासाच्या सामाजिक वाटचालीत अनेकांनी चमत्कार करवून आपले महात्म्य वाढविले आणि सामान्य जनतेला वेठीस धरलं. तर साधुसंतांनी आयुष्यभर चमत्कारांना विरोध करून विवेकदृष्टीने समाजाला ज्ञानविज्ञानाची कास धरण्याचा आग्रह केला. मात्र त्यांनीच सांगितलेल्या अभंगाचा किंवा विचारांचा शास्त्रीय अर्थ न लावता, त्यांच्याही चरित्रामध्ये परंपरावाद्यांनी मोठ्या खुबीने चमत्कार घडवले. हे आश्चर्यच ! यात संत तुकोबांचे सदेह वैकुंठगमन सर्वांना ज्ञातच आहे तर ज्ञानेश्वरांनी 'रेडेमुखी वेद वदविले' या पक्तींचा शास्त्रीय अर्थ न लावता प्रत्यक्ष चार पायाचा रेडा या प्राण्याच्या मुखी वेद वदविण्याचा चमत्कार केला. असे मान्य पावले. मात्र ज्ञानोबाने रेड्यामुखी वेद बोलविले अशा अर्थाचे कवन हे ज्ञानोबांचा चरित्रकारमहिपतीचे होय. जे निर्बुद्ध, अज्ञानी, ज्याचे डोके रेड्याप्रमाणे जड अशा सामान्य लोकापर्यंत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत वेद व गीता पोहचविली. म्हणून भारावून महिपतीनं तसे म्हणणे स्वभाविक होते. त्यात कोणताही चमत्कार महिपतीला मान्य नाहीच नाही ! मग ज्ञानोबांना कसा मान्य झाला असता ?

असेच एक उदाहरण सांगता येईल, स्वामी चक्रधर हे एका खेड्यात मुक्कामास राहिले. रात्री ते उकिरड्यावरच झोपी गेले. पहाटेच्या अंधारात येणाऱ्यांनी त्या उकिरड्यावर केरःकचरा टाकला उजाळल्यावर मात्र स्वामी अंगावरील कचरा झाटकत उठले व पुढे मार्गस्थ झालेत. हे काही गावकऱ्यांनी पाहिल्यावर शहानिशा न करता उकिरडा व्यायला म्हणून अफवा पसरविली. गावावर मोठे आरिष्ट येईल म्हणून सर्व गावकऱ्यांनी कामे बाजूला ठेवून उकिरड्याची शांती करून गावपंगत दिली. पालाशविधी डांकाविधी1 असे अनेक प्रसंग समाजात घडतात. मात्र त्यांचा कार्यकारणभव न शोधता केवळ ते चमत्कारच होत अशा अंधश्रद्धा समाज बाळगून असतो. म्हणून या अंधश्रद्धा घालविण्याकरिता जोतिबांनी शिक्षणाचा मूलमंत्र दिला. आपल्याला मोठ्या श्रद्धेने स्त्रिया व दलितांना शिक्षणाची दारे उघडून दिलीत. या देशातून आणि महाराष्ट्रातून अनेक समाजसुधारक पुढे आलेत? शिक्षणचा आग्रह धरला कारण शिक्षण ही सर्वांगीण सुधारणांची गुरूकिल्ली असल्याचे ते समजत होते.

***स्त्रीषक्तीचा सदुपयोग :***

स्त्रियांवर तर अनेक क्रूर रूढी–परंपरा ह्या श्रद्धेचा अविष्कार समजून पुरुषप्रधान संस्कृतीत खूप अन्याय अत्याचार होत. सती पद्धतीमुळे तर धर्माच्या नावाने स्त्रियांचे खूनच होत. बालिकाहत्त्या, बालविवाह, बालजरठ विवाह, वैधव्य, केशवपन, विधवा पुनर्विवाहाला विरोध या सामाजिक आणि धर्मिक अंधश्रद्धाळू बाबींमुळे तर स्त्रियांचे जीवन अधिकच मरणप्राय यातना देणारे ठरले होते. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे स्त्रियांमध्ये प्रागतिक जाणिवा निर्माण होत नव्हत्या. म्हणून आपल्यावर लादण्यात आलेल्या या अंधश्रद्धांच त्या धर्म म्हणून पालन करण्यातच धन्यता पावत. त्यामुळे स्त्री ही उंबरठ्याच्या आतच राहात असे. कोणत्याही सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय पुनरुत्थानाच्या चळवळीत स्त्रियांना योगदान देता येत नसे. समाजात निम्मे लोकसंख्या असलेली स्त्रियांची शक्ती राष्ट्रउभारणीपासून वंचित ठेवली जाई. अशा अंधश्रद्धांमुळे समाजाच्या आणि पर्यायाने राष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण होत असे[2]

तसेच समाजात चातुर्वर्ण्य पद्धतीनुसार चालणारे सर्वच व्यवहारसुद्धा घातकच होते. लढण्याचे काम फक्त क्षत्रियांनीच कराव, असे असल्यामुळे इतर जातीःजमातींच्या पराक्रमावर विश्वासच नव्हता. असे विविध सामाजिक घटकही राजकीय क्षेत्रापासून दूरच राहिले आणि मूठभर लढणाऱ्यांना परकीय राजवटींविरूद्ध पराभवाची नामुष्की या अंधश्रद्धाळूबाबींमुळेच पत्करावी लागली. छत्रपती शिवरायांनी मात्र राष्ट्रीय लष्कराची उभारणी करून सर्व जाती–जमातींच्या लोकांना लष्करी आणि सनदी व्यवस्थेत सामावले. मात्र असे राज्यकर्ते हे अपवादानेच झालेत, म्हणून पुढे जैसे थे परिस्थिती निर्माण होत असे.

***जाणिवांचा अभाव :***

आज आपण वैज्ञानिक युगात वावरतो, गत इतिहासकाळातील अंधश्रद्धांना आपण मूठमाती दिली आहे. केशवपन, विधवा पुर्नविवाहास विरोध, स्त्रीला निम्न समजणे, मुलीचा जन्म अशुभ मानणे, जातीभेद, वरिष्ठ–कनिष्ठ ह्या बाबी केवळ अंधश्रद्धा आहेत, समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासातील अडथळा आहेत, या जाणीवेतून आपण त्यांना विकासातील तिलांजली दिली आहे. असे असले तरी सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही समाज गटांतून भूतबाधा, जादुटोणा, मंत्रतंत्र, जारण–मारण, मूठ मारणं, चेटूक–चेटकीण, ताईत भारूण देणे, तोडगे करणे, अंगात येणे, शांती करणे, नवस करणे, मुहूर्त पहाणे, कुंडली काढणे, अनेक प्रकारचे उपासतापास करणे, पशुबळी देणे, व्रतवैकल्ये करणे, पोथी वाचन करणे, देवीला पायी जाणं, वैद्यकीय उपाचारांपेक्षा अघोरी उपाय करून घेणे तांत्रिक व मांत्रिकांवर विश्वास ठेवणं, वैज्ञानिक सिद्धांत एव्हढे सर्वश्रुत व सर्वमान्य असतांना नवसानं मुलगा होतो यावर विश्वास ठेवणे, बदमाश व ढोंगी लुबाडणऱ्या बुवा–महाराजांच्या आहारी जाणे3 या अंधश्रद्धामुळे वैयक्तिक समाज आणि देशाचे प्रचंड नुकसाान होत असते. देव–देवता, बुवाबाजी, भोंदू वैद्य यांच्यामागे हजारोंच्या संख्येने माणसे लागतात. त्यामुळे जनहिताची कामे सार्वत्रिक श्रमातून निर्माण होत नाही, समाजाची प्रगती खुंटते, मोठया प्रमाणावर तरूणाची क्रयशक्ती नष्ट होते. याचाच परिणाम राष्ट्र उभारणीत योगदान दिले जात नाही.

पूर्वी साध्या शारीरिक क्रियांविषयीसुद्धा अपभ्रंश होते. एखाद्यावेळेस जर नाकातोंडातून रक्त पडून मृत्यू झाला तर बाहेरची बाधा किंवा झपाटणे असा अर्थ लावला जाई. आज मात्र वैद्यकशास्त्राने खूप मोठी प्रगती केली आहे. वर सांगितल्याप्रमाणे क्रिया ह्रदयरोगाचा झटका असलयाचे सिद्ध झाले आहे. अशा अनेक शारीरिक क्रियांमधील सत्य वैद्यकशास्त्राने शोधून काढले असतांनाही लोक अंधश्रद्धाळू कल्पनांना का कवटाळतात ? शास्त्रीय चिकित्सा न करता, त्या घटनेमागील कार्यकारणभाव न तपासता, त्याची प्रचिती न घेता केवळ गैरसमजांवर विश्वास ठेवतात. त्यामुळे बुवाबाजीचे स्तोम माजते? काही समस्यांची कारण शोधून त्यांचा निचरा करण्याकरिता प्रयत्न करण्याऐवजी लोक बुवाबाजींच्या आहारी जातात. यात फसवणूक होत असते. स्त्रियांची तर आर्थिक आणि प्रसंगी शारीरिक शोषणही होत असते. या अंधश्रद्धाळू बाबींचा समाजमनावर आणि समाजाच्या जडणघडणीवर विदारक परिणाम होत असतो.[4]

### *अंधश्रद्धांचे स्वरूप :*

बदलत्या परिस्थितीनुसार अंधश्रद्धांमध्ये, त्यांच्या स्वरूपांमध्ये बदल होत जातो. आजही काही स्त्रिया व्रतवैकल्ये, कर्मकांड करतांना दिसतात. अंगात येणारी स्त्री कुंकू, बुक्का विभूती काढून दाखविते. एखादा बुवा सोन्याचे दागिने हवेतून काढून दाखवितो. कोणी बुवा पाण्यला स्पर्श करून पेट्रोल बनवितो. मातेच्या गर्भातील मुलीला मुलगा बनवितो. हे खरंच घडू शकते का ? याचा विचार आपण केला पाहिजे. कोणताही पदार्थ कायीक, रासायनिक अभिक्रियेशिवाय निर्माण होवूच शकत नाही. कारण कोणत्याही पदार्थाच्या निर्मितीकरिता प्रचंड प्रमाणात ऊर्जा लागत असते, हे वैज्ञानिक सिद्धांत निकष आपल्याला माहित असतांना आपण नुसते स्पर्शाने काही तरी निर्माण होते यावर विश्वास कसा ठेवतो ? याचे प्रत्येकाने आत्मपरिक्षण केले पाहिजे. चित्रपटातल्या एखाद्या तारकेला सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिरातीकरिता कंपनीकडून पैसा मिळतो. मात्र ही प्रसाधने खरंच आरोग्यवर्धक आहेत का ? हे न पाहता त्यांची खरेदी करण आणि वापरण ही सुद्धा अंधश्रद्धाच आहे, कारण मुली त्या तारकाचे अंधारुनुकरण करीत असतात. अशा अनेक अंधश्रद्धा आपल्या समाजात या ना त्या कारणांनी जपल्या जातात. त्यामुळे मोठया प्रमाणावर पैसा, वेळ, श्रमशक्ती, बळ खर्ची पडत असते? म्हणून आपले नशीब घडवणे हे आपल्याच हातात असते? मानवनिर्मित भेद टाकून दंणे, स्त्रीषक्तीचाही विधयक कार्यात उपयोग करून घेणं, ही अत्यावश्यक बाब आहे.5 अंधश्रद्धा : विकासातील अडथळा असल्याने सर्वच जाणिवांनी युक्त व्यक्तीमत्वे घडविणे, एक सुदृढ समाज निर्माण करून सामर्थ्यशाली राष्ट्राची उभारणी करणं काळाची गरज आहे.

### *संदर्भसूची –*

1.वाड जी. सी., पेशवा डायरी, खंड–7, ले. 712, पृ. 285.
2.कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास, नागपूर, म.वि.ग्रं.नि.मंडळ, पृ. 321.
3.खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास – मराठा कालखंड, भाग–2, मुंबई, महाराष्ट्र शासन, 1988, पृ. 687.
4.भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, दिल्ली, अनुसंधान इतिहास परिषद, 1976, पृ. 214:15.
5.सिन्हा एच. एन., सिलेक्शन फ्रॉम नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड, खंड 3, पृ. 15:20.



***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net